सद्रक्षणाय् खलनिग्रहणाय्

पुणे शहर पोलीस

# दर्पण

जानेवारी २०२०

# पोलिसांमधील माणूस

पोलिसांमधील
माणूस

लोकमत – दि. २२ जानेवारी, २०२०

# रेसकोर्सजवळ सापडलेली लॅपटॉपची बॅग केली परत

## पोलिसांची कामगिरी : कर्तव्य तत्परता पाहून भारवल्या महिला वकील

लोकमत न्यूज नेटवर्क



पोलीस पथक सापडलेल लॅपटॉप परत करताना.

**हडपसर :** हडपसर पोलिसांना रस्त्यात वानवडी रेसकोर्सजवळ लॅपटॉपसह महत्त्वाची कागदपत्रांची बॅग सापडली. बॅग तपासली असता ती बॅग अ‍ॅड. पूजा ठाकूर यांची असल्याचे समजले. त्यांच्याशी संपर्क करून त्यांना पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांच्या उपस्थितीत परत केली.

पोलिसांनी सांगितले की, अ‍ॅड. पूजा ठाकूर (रा. अक्षय अपार्टमेंट, रॉयलवर्ल्ड शाळा, पिंपरी) या स्कूटरवर पिंपरीहून हडपसरकडे येत असताना लॅपटॉप असलेली बॅग हरवली. दरम्यान, हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक प्रशांत कळसकर, कैलास लोणकर, अनिल गायकवाड, शंकर नेवसे हे लष्कर कोर्टातून

होते. त्या वेळी त्यांना वानवडी रेसकोर्सजवळ रस्त्याच्या बाजूला लाल रंगाची बॅग सापडली. त्यांनी हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांना माहिती दिली. त्यानंतर त्यांनी बॅगची तपासणी केली, त्या वेळी त्यामध्ये एक लॅपटॉप आणि

त्यामध्ये त्यांना अ‍ॅड. ठाकूर यांचा मोबाइल क्रमांक मिळाला. त्यानुसार त्यांच्याशी ऑनलाइन संपर्क केला. ही बॅग वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव यांच्या उपस्थितीत परत केली. या वेळी अ‍ॅड. ठाकूर यांनी पोलिसांच्या प्रामाणिकपणा आणि कर्तव्य

# प्रताड़ित दृष्टिहीन सीनियर सिटीजन महिला को पुलिस ने की मदद

## 'भरोसा सेल, सीनियर सिटीजन कक्ष' ने शिकायतकर्ता महिला व आरोपी की काउंसिलिंग कराई

**पुणे, 25 जनवरी (आ.प्र.)**

पुणे पुलिस आयुक्तालय के 'भरोसा सेल, सीनियर सिटीजन कक्ष' में दृष्टिहीन महिला सुलोचना बनसोड़े ने अपने भांजे के खिलाफ ठगी व धमकाए जाने की शिकायत 13 जून को दर्ज कराई थी. शिकायत पर कार्रवाई करते हुए शिकायतकर्ता एवं आरोपी को एक साथ वहां बुलाकर दोनों की शिकायतों व अड़चनों की जानकारी ली.

जांच में पाया गया कि शिकायतकर्ता के पति ने शिकायतकर्ता के नाम 1989 में अक्कलकोट में 8 एकड़ जमीन खरीदी थी. वह जमीन घर से काफी दूर होने से बनसोड़े दम्पति खुद खेती करने में असमर्थ थे, इसके चलते उन्होंने इस जमीन के प्लॉट्स बनाकर उनकी बिक्री करने का निर्णय लिया. शिकायतकर्ता के भांजे ने प्लॉट्स बनाने पर सहमति जताई. बनसोड़े पति-पत्नी ने आरोपी के साथ इस विषय में पूर्ण एग्रीमेंट किया व इसके लिए 4,75,000 रुपए कैश लिए. प्लॉट्स बनाने के लिए आठ साल की अवधि निर्धारित की गई.

शिकायतकर्ता के सीनियर सिटीजन होने व उनके दो पुत्र होने के चलते वह इस विषय में ज्यादा ध्यान नहीं दे पाई. साथ ही दृष्टिहीन शिकायतकर्ता के पति की लंबी बीमारी के चलते मौत हो गई. इस घटना के बाद आरोपी ने दी गई 4 लाख 75 हजार रुपए की राशि का अब तक 5% प्रतिमाह के हिसाब से ब्याज कैश देने की मांग की. ब्याज न देने पर जमीन अपने नाम कराए जाने की मांग को लेकर आरोपी लगातार शिकायतकर्ता महिला को परेशान कर रहा था.

सीनियर सिटीजन कक्ष द्वारा इससे संबंधित सभी लोगों को कई बार बुला कर उनकी काउंसिलिंग की गई. उन्हें सीनियर सिटीजन की ठगी या उन्हें धमकाने को लेकर होने वाली कार्रवाई की भी पूर्ण जानकारी दी गई व उन्हें शिकायतकर्ता को धमकाने या मानसिक रूप से प्रताड़ित करने पर की जाने वाली कार्रवाई के विषय में विस्तृत जानकारी दी गई. आरोपी से शिकायतकर्ता को किसी भी तरह से परेशान न किए जाने की जमानत लेकर रिहा किया गया.

24 जनवरी को शिकायतकर्ता ने खुद पुलिस कमिश्नर के. व्यंकटेशम से मिलकर उन्हें बताया कि 'भरोसा सेल' की सीनियर इंस्पेक्टर वैशाली चांदगुडे व पूनम वारसकर की काउंसिलिंग से उनकी शिकायत दूर हो गई है. साथ ही 'भरोसा सेल' व वरिष्ठ नागरिक कक्ष से बुजुर्ग नागरिकों को दी जाने वाली सहायता व योगदान के विषय में उन्होंने पुलिस कमिश्नर एवं पुणे शहर पुलिस को अभिनंदन पत्र भी दिया है.

लोकमत – दि. २२ जानेवारी, २०२०

# रिक्षाचालकाने परत केले ७ लाखांचे दागिने

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : गडबडीत मौल्यवान दागिने असलेली बॅग रिक्षात विसरल्याने त्या भांबावलेल्या होत्या. पोलीसही तत्परतेने सीसीटीव्हीच्या मार्फत रिक्षाचालकाचा शोध घेत होते. काही ठिकाणी विसरलेली बॅग रिक्षात दिसत होती; पण रिक्षाचा नंबर स्पष्टपणे दिसून येत नव्हता. सायंकाळी पाच वाजल्यापासून पोलीस सतत ४ तास रिक्षाचालकाचा शोध घेत होते. त्यातच रात्री उशिरा रिक्षाचालक स्वत:च प्रामाणिकपणे हरविलेली बॅग घेऊन स्वारगेट पोलीस ठाण्यात हजर झाला. चार तास सुरु असलेला तपासाचा शेवट असा गोड झाला.

तुकाराम यादवराव काळे (रा. अक्षय हाईट सोसायटी, ससाणेनगर) असे या प्रामाणिक रिक्षाचालकाचे नाव आहे. पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त



सर्जेराव बाबर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवडी यांच्या हस्ते रिक्षाचालक काळे यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबतची माहिती अशी : शोभा संदीप लुंकड (वय ५५, रा. बिबवेवाडी) या त्यांच्या मुलीसमवेत मोलेदिना रोडवर खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. शॉपिंग करुन त्या सोमवारी सायंकाळी ५ वाजता रिक्षाने अप्सरा टॉकिजजवळील मुलाच्या कार्यालयाजवळ आल्या. त्यांनी रिक्षातून उतरुन पैसे दिल्यावर त्या कार्यालयात गेल्या. तेव्हा ५ लाख रुपयांचे डायमंडचे ब्रेसलेट आणि २ लाख रुपयांचे डायमंडचे कानातील डुल, ३ हजार रुपयांचे कपडे असलेली बॅग रिक्षातच विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने स्वारगेट पोलिसांशी संपर्क साधला. ही माहिती समजल्यावर वरिष्ठ निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली एक पथक तयार करुन पोलीस नाईक खोमणे व कांबळे हे सीसीटीव्हीवरुन रिक्षाचालकाचा शोध घेऊ लागले.

काही ठिकाणी ही रिक्षा आढळून आली; पण तिचा नंबर व्यवस्थित दिसत नव्हता. जवळपास रात्री साडेअकरा वाजेपर्यंत हा शोध सुरु होता. त्याचवेळी रिक्षाचालक तुकाराम काळे हे स्वारगेट पोलीस ठाण्यात हरविलेली बॅग घेऊन हजर झाले. त्यांना विचारले असता काळे यांनी सांगितले, की आपण त्यांना सोडल्यानंतर, काही वेळाने बॅग विसरल्याचे लक्षात आले.म्हणून पुन्हा त्या ठिकाणी जाऊन गेलो. तेथील रखवालदाराकडे चौकशी केली; पण त्यांना लुंकड यांची माहिती देता आली नाही. त्यांनी बॅग येथे ठेवा, असे सांगितले. मात्र, आपल्या ग्राहकाची बॅग त्याच्याच हातात देण्यासाठी तेथे न ठेवता ती पोलीस ठाण्यात घेऊन आल्याचे त्यांनी सांगितले. दागिने परत मिळाल्याचे पाहून लुंकड यांनीदेखील रिक्षाचालकाचे आभार मानले.

लोकमत – दि. ८ जानेवारी, २०२०

# 'त्या' दोघी मैत्रिणीकडे राहिल्या, आई-वडिल रात्रभर होते चिंतेत

## लष्कर पोलिसांनी लावला छडा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या त्या दोघी आपल्या मैत्रिणीला भेटायला शहराजवळच्या उपनगरात गेल्या. तेथे उशीर झाला. आईवडिलांच्या धास्तीने त्या मैत्रिणीकडेच राहिल्या. इकडे १७ वर्षांच्या मुली घरी न आल्याने आईवडिलांसह सर्व शोध घेऊ लागले. लष्कर पोलीस ठाण्यात हरविल्याचे तक्रार दाखल झाली. कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या या मुली बेपत्ता झालेल्या व सध्याचे वातावरण लक्षात घेता पोलीसही सतर्क झाले. त्यांनी महाविद्यालयापासून एक एक धागा जुळवत चौकशी करीत या मुली राहिल्या होत्या, त्या मैत्रिणीचे घर गाठले. तेथे या मुली सुरक्षित पाहून आईवडिलांबरोबरच पोलिसांचाही जीव भांड्यात पडला.

सर्वसामान्य कुटुंबातील १७ वर्षांच्या मुली बेपत्ता झाल्याची तक्रार लष्कर पोलीस ठाण्यात आली. ४ जानेवारीला पहाटे गुन्हा दाखल झाला. या मुलींच्या आईवडिलांकडून त्यांनी माहिती घेतली. पोलीस उपनिरीक्षक संजय लोखंडे, कुलाळ, हवालदार शितोळे, फल्ले, भोसले, राऊत, मांजरे ही टिम कामाला लागली. त्यांनी महाविद्यालयात जाऊन चौकशी केल्यावर त्यांना या मुली सकाळी साडेनऊला महाविद्यालयातून बाहेर पडल्याची माहिती मिळाली. मैत्रिणीकडे चौकशी केल्यावर त्यांनी एक मुख्य दरवाजातून बाहेर गेली तर, दुसरी तारेचे कंपाऊंड ओलांडून बाहेर गेल्याची माहिती मिळाली. त्यानंतर महाविद्यालयाच्या बाहेर पोलिसांनी चौकशी करण्यास सुरुवात केली. तेव्हा तेथे आदल्या दिवशी या दोन मुली एका रिक्षात बसून गेल्याची माहिती मिळाली व ती रिक्षा 'ओला'ची असल्याचा आणखी एक धागा मिळाला. या धाग्यावरुन पोलिसांनी ओला कंपनीच्या मुंबईच्या कार्यालयात संपर्क साधला. त्यांच्याकडे चौकशी केल्यावर आदल्या दिवशी त्या वेळी तेथून गेल्या ओला रिक्षाचा क्रमांक व चालकाचा नंबर पोलिसांना मिळाला. त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने दोन मुली आपल्या रिक्षातून गेल्याचे सांगितले. त्याने आपल्यालाही दोन मुली आहेत, असे सांगून त्यांचा शोध घेण्यासाठी तो तातडीने एसजीएस मॉलसमोर आला. त्याच्याच रिक्षातून पोलीस थेट बोपखेल येथे पोहचले. त्या मुलींना त्याने ज्या इमारतीसमोर सोडले होते. तेथे आणून सोडले. पोलिसांनी चौकशी केल्यावर वरच्या मजल्यावरील एका घरात दोन मुली आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस त्या घरात पोहचले. दरवाजा उघडल्यावर या दोन मुली अगदी सुखरुप असल्याचे पाहून पोलिसांना आपल्या श्रमाचे चीज झाल्यासारखे वाटले. त्यांनी आईवडिलांना बोलावून दोघांना त्यांच्या ताब्यात दिले. आई रागवतील म्हणून तिथेच राहिल्या.

**लोकमत** – दि. २३ जानेवारी, २०२०

# मित्रांचे प्रसंगावधान अन् पोलिसांची तत्परता

## स्पर्धा परीक्षेतील अपयशाने नैराश्य आलेल्या तरुणाचे वाचविले प्राण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पर्धा परीक्षेत यश मिळवून चांगले करियर करण्याचे स्वप्न पाहात हजारो तरुण पुण्यात येतात. त्यातील मोजकेच तरुण यशस्वी होतात. मात्र, त्यातील काही जणांना अपयश पचविणे अवघड जाते. ते नैराश्येच्या गर्तेत जातात व त्यातून अघटित कृत्य करण्याचे विचार मनात घोळत असतात. अशाच एका तरुणाने आपल्या मनातील विचार मित्रांना मेसेज करुन कळविला. मित्रांनी त्याचा मेसेज पाहून प्रसंगावधान दाखवत पोलिसांशी संपर्क साधला. शिवाजीनगर पोलिसांनीही गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने त्या तरुणाचा शोध घेऊन त्याला आत्महत्येपासून परावृत्त केले.

पोलीस नाईक गोरे, मार्शलवरील कर्मचारी हवालदार तरटे, पोलीस नाईक इनामदार यांनी तातडीने वडारवाडीत मित्रांना घेऊन गेले. त्यांनी या तरुणाला पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर त्याला तो करत असलेला विचार कसा चुकीचा आहे. अनेकांना संघर्ष करत असताना कसे अपयश आले, तरी देखील त्यांनी हार न मानता प्रयत्न करून यश प्राप्त केले असे समजावून सांगत त्याचे समुपदेशन केले. आपल्या वडिलांसारखेच असलेल्या पोलिसांचे विचार ऐकून हा तरुण शांत झाला व त्याने यापुढे असा विचार कधी करणार नाही, असे आश्वासन पोलिसांना दिले. त्यानंतर पोलिसांनी या तरुणाला मामाच्या ताब्यात दिले.

### मित्र भांबावून गेले...

- याबाबत पोलिसांनी सांगितले की, २४ वर्षांचा हा तरुण मूळचा कोल्हापूरचा असून, त्याचे वडील मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मागील दोन वर्षांपासून तो पुण्यातील गोखलेनगर भागात राहतो. मात्र, स्पर्धा परीक्षेत यश मिळत नसल्याने तो निराश होता. २० जानेवारी रोजी त्याने सकाळी त्याने मित्रांना व्हॉट्सअॅप केला. त्यात, 'मला स्पर्धा परीक्षेत अपयश आल्याने नैराश्यात असल्याने मी रेल्वेखाली उडी टाकून आत्महत्या करणार आहे' असे लिहिले होते. हा मेसेज पाहून त्याचे मित्र भांबावून गेले. पण, दुसऱ्याच क्षणी त्यांनी तातडीने शिवाजीनगर पोलीस ठाणे गाठले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब कोपनर, पोलीस निरीक्षक मनीषा झेंडे यांनी हा मेसेज पाहिला. त्यांनी तातडीने या तरुणाच्या मोबाईलचे लोकेशन घेतले. तेव्हा तो वडारवाडी येथे असल्याचे दिसून आले.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. ५ जानेवारी, २०२०



रिक्षाचालकासह वाहतूक पोलिस कर्मचारी.

# पोलिसांमुळे वाचले रिक्षाचालकाचे प्राण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कोरेगाव पार्क येथे रिक्षामध्ये छातीला हात लावून पडलेला रिक्षाचालक वाहतूक पोलिसांना दिसला. चौकशी केल्यानंतर छातीमध्ये दुखत असल्याचे रिक्षाचालकाने सांगितल्यावर पोलिसांनी वेळीच त्यांना ससून रुग्णालयात दाखल केले. त्या वेळी रिक्षाचालकास हृदयविकाराचा झटका आला असून, वेळेवर उपचार मिळाल्यामुळे त्यांचा जीव वाचल्याचे डॉक्टरांनी सांगितले. उपचार पूर्ण झाल्यानंतर रिक्षाचालकाने कुटुंबासह पोलिस आयुक्त व पोलिस कर्मचाऱ्यांची भेट घेतली आणि 'देवरूपात पोलिसच माझ्या मदतीला धावून आले,' अशी भावना यांनी व्यक्त केली.

अशोक राजाराम वाडेकर (वय ६०) असे रिक्षाचालकाचे नाव आहे. राहुल दमडेरे, नितीन भागवत व विनोद कायगुडे अशी पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. वाडेकर दिघी परिसरात राहण्यास आहेत. ते पुणे शहरात प्रवासी रिक्षा चालवतात. कोरेगाव पार्क वाहतूक विभागातील कर्मचारी दमडेरे, नितीन भागवत व विनोद कायगुडे नेमणुकीला आहेत. दोन दिवसांपूर्वी सकाळी नऊ परिसरात पेट्रोलिंग करणे, वाहतूक सुरळीत करण्याचे काम करीत होते. त्या वेळी मोबोज चौकात रिक्षात एक रिक्षाचालक छातीला हात लावून झोपलेला आढळून आला. त्यांनी तत्काळ दुचाकी थांबवून रिक्षाचालकास काय झाले, याची विचारणा केली असता, छातीत दुखत असल्याचे रिक्षाचालकाने सांगितले. परिस्थितीचे गांभिर्य ओळखून पोलिसांनी दुसऱ्या एका रिक्षातून त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. त्या वेळी त्यांना घेऊन जाण्यासाठी दोघांनी दुचाकीवरून पायलेटिंग केली. वाडेकर यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी उपचार सुरू केले. त्या वेळी त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तसेच, वेळेवर दाखल केल्यामुळे त्यांचे प्राण वाचल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

पोलिस कर्मचाऱ्यांनी वाडेकर यांच्या मुलास फोन करून घटनेची माहिती दिली. उपचारानंतर वाडेकर यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. त्यानंतर वाडेकर यांनी कुटुंबासह पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांची भेट घेऊन दमडेरे, भागवत, कायगुडे यांचे आभार मानले. या वेळी त्यांनी पोलिस देवरूपात धावून माझ्या मदतीला आले असल्याची भावना व्यक्त करून त्यांचे आभार मानले.

# साताऱ्यातील युवक सोशल मीडियामुळे सापडला पुण्यात

## पंधरा मिनिटांत शोध : पोलिसांनी व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवले

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सोशल मीडियावरून अनेकदा अफवा पसरविल्या जात असल्याचे बोलले जाते. पण या मीडियाचा चांगल्या कामासाठीही उपयोग होऊ शकतो, याचा प्रत्यय रविवारी सायंकाळी आला. स्वारगेट पोलीस ठाण्यामध्ये रविवारी सायंकाळी एक १७ वर्षांचा मुलगा आला. त्याने आपण निजामुद्दीन एक्स्प्रेसने पुण्यात आलो असून आपले नाव अभिषेक आहे.



अभिषेक घोरपडे

याशिवाय आपल्याला काहीही आठवत नसल्याचे सांगितले. काही वेळातच पोलिसांनी या युवकाची माहिती पुणे शहर, जिल्हा तसेच कोल्हापूर, सातारा पोलिसांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर पाठविली. साधारण दहा मिनिटांतच हा युवक साताऱ्यातून हरविला असल्याचे व त्याची बेपत्ता असल्याची तक्रार इस्लामपूर येथे नोंदविण्यात आल्याचे सांगण्यात आले. सोशल मीडियाचा वापर करून एका हरविलेल्या मुलाचा काही मिनिटांतच शोध लागला.

अभिषेक रवींद्र घोरपडे (वय १७, रा. मल्यापूर, ता. जि. सातारा) असे या युवकाचे नाव आहे. त्याचे नातेवाईक त्याला घेण्यासाठी साताऱ्याहून निघाले आहेत.

सोशल मीडियाचा चांगल्या कामासाठी वापर केला तर अशी मदत होऊ शकते, हे या प्रसंगातून दिसून आले.

### ग्रुपमध्ये माहिती पसरल्याने लगेच हालचाल

- रविवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एक युवक स्वारगेट पोलीस ठाण्यात आला होता. त्याला काहीही आठवत नव्हते. पोलीस निरीक्षक सय्यद यांनी त्याला धीर देऊन चौकशी केली. तेव्हा त्याच्या भाषेवरुन तो कोल्हापूर भागातील असावा असा त्यांना अंदाज आला. त्याप्रमाणे त्यांनी त्याची माहिती व फोटो सातारा, कोल्हापूर, सांगली येथील पोलिसांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर पाठविली. तेथील पोलिसांनी आपापल्या ग्रुपवर फोटो व माहिती टाकली.
- तेव्हा तो १६ जानेवारीला इस्लामपूर येथून निघून गेल्याची हरविल्याची तक्रार नोंदविण्यात आली होती. सातारा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी हा युवक साताऱ्यातील असल्याची माहिती दिली. अभिषेक हा अकरावीत शिकत असून त्याचे वडील ठाणे ग्रामीण पोलीस दलात कार्यरत आहेत. गेले दोन दिवस अभिषेकचा शोध घेणाऱ्या नातेवाईकांना पुणे पोलिसांच्या या तत्परतेने दिलासा मिळाला आहे. ते अभिषेकला घेण्यासाठी पुण्याकडे येण्यास निघाले आहेत.

पुण्यनगरी – दि. २ जानेवारी, २०२०

# पोलिसांसह तरुणाईने दिला 'दारू नको, दूध प्या'चा संदेश

## युवकांचा मोठा सहभाग : डॉ. जाधवर ट्रस्ट, सिंहगड रस्ता पोलीस स्टेशन व लायन्स क्लब ऑफ पुणे पर्लतर्फे अभियान



। धायरी : प्रतिनिधी

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना चित्रपटांच्या गाण्यावर थिरकणारी आणि मद्यधुंद झालेले तरुण- तरुणी दिसतात. परंतु, व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकत चाललेल्या तरुणाईला निरोगी आरोग्याचा मार्ग दाखविण्याकरीता वर्षाअखेरीच्या मध्यूर संध्येला संकल्प करू, दारू न पिता दूध पिऊन नवीन वर्षाचे स्वागत करू... असे म्हणत महाविद्यालयीन तरुणाई आणि पोलिसांनी पुढाकार घेतला. 'दारू नको, दूध प्या' असा संदेश देत तरुणाईसोबत पोलिसांनी देखील दूध वाटप केले.

सिंहगड रस्त्यावरील वडगाव पुलाखालील चौकामध्ये प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सोशल अँड एज्युकेशनल ट्रस्ट, सिंहगड रस्ता पोलीस स्टेशन, लायन्स क्लब ऑफ पुणे पर्ल यांच्या संयुक्त विद्यमाने दारू नको, दूध प्या अभियान राबविण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक नंदकिशोर शेळके, सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्र आदलिंग, हेमंत दांगट, रामकिशन कलवले, लायन्स क्लबचे सुनील चढ्ढा, माणिक निवंगुणे, प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक तरुण मद्यधुंद होऊन व्यसनाच्या विळख्यात अडकतात. मद्यपान करून भरधाव वेगाने गाडी चालविल्यामुळे अनेक अपघात देखील होतात. नव्यावर्षाच्या सुरुवातीला असे कोणतेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी दारू नको, दूध प्या हा उपक्रम स्तुत्य आहे. तरुणांनी नशेच्या आहारी न जाता चांगले संकल्प करून नव्यावर्षाचे स्वागत केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, नववर्षाचे स्वागत करताना चांगले विचार आणि संकल्प मनात ठेवून प्रत्येकाने व्यसनमुक्त भारताचे स्वप्न रंगवावे, याकरीता या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशाची युवापिढी निरोगी असेल तर देशाचा अधिक विकास होतो. आपल्या देशाला महासत्ता बनवायचे असेल तर तरुणांनी निरोगी असले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या मुलीला दामिनी पथकाने वाचविले

पुणे : आई-वडिलांकडून सतत्याने लग्नाचा मानसिक त्रास दिला जात असल्याच्या रागातून अकरावीत शिकणाऱ्या १६ वर्षीय मुलीने शाळेतच बाकावर डोके आपटून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, दामिनी पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मुलीचे समुपदेशन करून तिला वाचविले आहे. यापूर्वीही मुलीने दोन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना नुकतीच दत्तवाडीतील शाळेत घडली.




मुलीचे आई-वडील वेगवेगळे राहत असून, ती दत्तवाडी परिसरात अकरावीच्या वर्गात शिक्षण घेते. काही कारणामुळे प्राध्यापक तिला समजावून सांगत होते. त्याचा राग आल्याने मुलीने अचानकच बाकावर डोके आपटून गोंधळ घालत जगायचं नाही, असे म्हणू लागली. तिला प्राध्यापक व इतर शिक्षकांनी खूप समजावण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर तिने अचानक बॅगेतून ब्लेड काढून हातावर मारून घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शालेय प्रशासनातील महिलांनी मुलीला पकडून ठेवून पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर दामिनी पथकातील स्वाती डी. डुकरे आणि श्वेता एल. कदम यांनी तत्काळ शाळेत धाव घेतली. मुलीला विश्वासात घेऊन तिची विचारपूस केली असता, मुलीने आई-वडिल सतत लग्न कर म्हणून मागे लागल्याने मी आत्महत्या करत असल्याचे सांगितले. त्यानंतर दामिनी पथकाने मुलीच्या मावशीला बोलावून चौकशी केली. त्यावेळी मुलीला वसतिगृहात राहायचे असल्याची माहिती दिली. अधिक चौकशीत एकटे राहता येण्यासाठी मुलीने दोन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. दामिनी पथकातील कर्मचारी डुकरे व कदम यांनी मुलीची समजूत काढून तिला मावशीसोबत घरी पाठविले.

# व्हॉट्सअ‍ॅपद्वारे शोधले ज्येष्ठ महिलेचे नातेवाईक

पुणे, दि. ३० (प्रतिनिधी) – शहरातील दत्तवाडी परिसरात हरवलेल्या एका ज्येष्ठ महिलेच्या नातेवाईकाचा पोलिसांनी व्हॉट्सअ‍ॅपच्या मदतीने शोध घेऊन त्यांना कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.



कुसुमबाई चोरडिया (वय ७७) असे महिलेचे नाव असून, दोन दिवसांपूर्वी त्या दत्तवाडीतील लायन्स क्लबजवळ पोलिसांनी आढळून आल्या होत्या. दत्तवाडी कम्युनिटी पोलिसिंगचे काम पाहणारे पोलीस हवालदार श्रीकांत शिरोळे यांना ज्येष्ठ महिला कुसुम यांचा फोटो व माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास घेवारे यांनी माहिती देऊन महिलेच्या नातेवाईकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. कुसुम यांचा फोटो दत्तवाडीतील नागरिकांच्या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर पाठविण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी महिलेचे दत्तवाडीतील नातेवाईक अशोक महेशप्रसाद यादव यांचा शोध घेतला. महिलेस त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस नाईक संतोष मेश्राम, जनाजी श्रीमंगले, तुळशीराम टेम्बुरणे, सामाजिक कार्यकर्ते अमित येवले, शशिकांत काळे यांनी केली.

सामना – दि. १९ जानेवारी, २०२०

# वाहतूक पोलिसांनी बुजवले रस्त्यावरील खड्डे



नगर : येथील मार्केटयार्ड चौकात वाहतूक सुरळीत करण्यासाठी तैनात असणाऱ्या वाहतूक पोलिसांनी येथील रस्त्यावर पडलेला खड्डा स्वत: बुजवला. पाण्याची पाइपलाइन टाकताना संबंधितांकडून रस्ता खोदण्यात आला होता. मात्र, काम झाल्यानंतर खोदलेला रस्ता त्यांनी दुरुस्त केला नाही. त्यामुळे रस्त्यावर खड्डे पडले होते. खड्ड्यांमुळे अपघात होऊ नये म्हणून पोलीस कर्मचाऱ्यांनीच पुढाकार घेत हे खड्डे बुजवले.

या खड्ड्यांमुळे अपघाताचा प्रसंग अनेक महिलांवर आला होता. येथून जाताना खड्ड्यांमधील मातीमुळे गाड्या स्लीप होत असल्याचेही महिलांनी सांगितले. त्याची दखल वाहतुकीला तेथे तैनात असणाऱ्या पोलिसांनी घेत संबंधित ठेकेदाराची वाट न बघता खड्डे बुजवले. त्यांच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाहतूक पोलिसांचा या कृतीबद्दल त्यांचा सत्कार अजय झिंजे व नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केला. बोराटे यांनी संबंधित ठेकेदाराला महापालिकेने बिल अदा करू नये, अशी मागणी केली.

# खाकीच्या 'उत्तम' नियोजनाने 'तो' सुखरूप परतला

- घर सोडलेल्या मुलाला स्वारगेट पोलिसांनी दिली दिशा
- बारावी सायन्सचा अभ्यास झेपत नसल्याने सोडले होते घर



सातारा : अभिषेकला नातेवाईकांकडे सोपवताना स्वारगेटचे पोलीस निरीक्षक सय्यद, सहाय्यक फौजदार उत्तम वीर.

प्रशांत जाधव

**सातारा, दि. २० -** तो एकटाच घाबरलेल्या अवस्थेत स्वारगेट पोलीस ठाण्यात आला... त्याचे वय अवघे १७ वर्षे... केवळ 'अभिषेक' हे नाव तो सांगत होता. त्यामुळे त्याच्या नातेवाईकांना शोधणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. पोलिसांनी प्रत्येक गल्ली पिंजून काढली. मात्र, हाती काहीच न लागल्याने पोलिसांनी 'व्हॉट्स ॲप' ग्रुपवरचर मुलाचे छायाचित्र व त्यांचा संपर्क नंबर व्हायरल केला. आणि काही वेळातच हरवलेला अभिषेक आई-वडिलांना सापडला.

रविवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पोलीस कर्मचारी आपापल्या कामात व्यस्त असतानाच मळकट कपड्यांतील मुलगा ठाण्याच्या आवारात आला आणि बाहेर उभ्या असलेल्या सहायक पोलीस उपनिरीक्षक उत्तम वीर यांना मिठी मारून रडू लागला. 'साहेब, काहीही करा मला माझ्या आई-वडिलांकडे सोडा' अशी विनवणी करू लागला.

वीर यांनी घटनेचे गांभीर्य ओळखत ही माहिती वरिष्ठांना दिली. त्यानंतर त्याला जेवण देण्यासाठी वीर यांनी कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. मात्र, तो 'खायला नको आई-वडिलांकडे सोडा' असे म्हणू लागला. त्यानंतर पोलिसांनी शोधाशोध केली तरीही नातेवाईकांचा शोध लागत नव्हता. पोलिसांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर अभिषेकचा फोटो व पोलिसांचा संपर्क क्रमांक पाठवण्यात आला. तो मेसेज साताऱ्याच्या पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांना आल्यानंतर त्यांनी तो मेसेज पोलीस जनसंपर्क या ग्रुपवर व्हायरल केला. त्यावर साताऱ्यातील पत्रकारांनी अभिषेक हरवल्याची पोस्ट त्याच्या एका नातेवाईकांनी सोशल मीडियावर केलेली माहिती टाकली.

पुणे पोलिसांनी दिलेला फोटो अन् घोरपडे यांनी सोशल मीडियावर टाकलेला फोटो एकच असल्याने, साताऱ्यातील माध्यम प्रतिनिधींनी तातडीने अभिषेकचे चुलते संजय घोरपडे यांना माहिती देत, तातडीने पुण्याला जाण्याबाबत सूचवले. घोरपडे कुटुंब रविवारी रात्री १० वाजता पुण्याच्या दिशेने रवाना झाले. मध्यरात्री हे सगळे स्वारगेट पोलीस ठाण्यात पोहचले आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पहाटे ५ वाजता अभिषेकचे मूळ गाव असलेल्या मत्यापूर (ता. सातारा) येथे पोहचले.

## घोरपडे कुटुंबाला अश्रू अनावर

पोलिसांना सापडलेला मुलगा केवळ 'अभिषेक' एवढचा शब्द उच्चारत होता. तसेच, १६ जानेवारी पासून त्याने काहीही खाल्ले नव्हते. त्यामुळे त्याला चक्कर येत होती. तो घाबरून रडतही होता. त्यामुळे पोलिसांना त्याच्या पालकांचा शोध घेण्यास विलंब लागला. मात्र, बऱ्याच वेळाच्या शोधमोहिमेनंतर पोलिसांना सोशल मीडियामुळे अभिषेकचे आई-वडील सापडले. त्यानंतर स्वारगेट पोलीस ठाण्यात पोहचलेल्या घोरपडे कुटुंबाला मुलगा सापडल्यानंतर अश्रू अनावर झाले होते.

## ...म्हणून सोडले होते घर

अभिषेक हा मुळचा मत्यापूर (ता. सातारा) येथील आहे. त्याचे वडील रवींद्र घोरपडे हे ठाणे जिल्हा पोलीस दलात नोकरीस आहेत. त्यांनी अभिषेकला बारावी विज्ञान शाखेच्या शिक्षणासाठी इस्लामपूर येथील नामवंत शिक्षण संस्थेत पाठवले होते. मात्र, त्याला विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम झेपत नसल्याने त्याने दि. १७ जानेवारीला घर सोडले होते.

# तरुणाला आत्महत्येपासून पोलिसांनी केले परावृत्त

## स्पर्धा परीक्षेच्या नैराश्यातून निघाला होता जीवन संपवायला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

तो मूळचा कोल्हापूरचा...वडील मुंबई पोलिस दलात कार्यरत... स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी तो मागील दोन वर्षापासून पुण्यात वास्तव्यास आहे. मात्र स्पर्धा परीक्षेत यश मिळत नसल्याच्या कारणातून तो नैराश्यात गेला. त्यामुळे आत्महत्येचा विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. यातूनच त्याने मित्राच्या व्हॉट्सॲपवर मला स्पर्धा परीक्षेत अपयश आल्याने नैराश्यात असल्याने मी रेल्वेखाली उडी टाकून आत्महत्या करणार आहे, असा मसेज टाकला. मात्र मित्राने दाखविलेले प्रसंगावधान व पोलिसांची तत्परता यामुळे वेळीच तरुणाला सुखरूप ताब्यात घेऊन त्याचे समुपदेश करून पालकांच्या ताब्यात दिले.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, आत्महत्या करणार आहे, असा मेसेज टाकणारा २४ वर्षीय तरुण त्याच्या मित्रासोबत सेनापती बापट रोड परिसरात वास्तव्यास आहे. दोन वर्षापासून तो पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करतो. तो मूळचा कोल्हापूरचा असून, वडील मुंबई पोलिस दलात कार्यरत आहेत. यश मिळत नसल्याच्या कारणातून त्याला नैराश्य आल्याने त्याने आत्महत्या करणार असल्याचा मेसेज मित्राच्या मोबाईलवर टाकला होता. परंतु मित्राने मेसेज वाचताच याची माहिती शिवाजीनगर पोलिसांना दिली. त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता महिला पोलिस निरीक्षक (गुन्हे) झेंडे यांनी वरिष्ठ निरीक्षक कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत असताना आत्महत्येचा मेसेज टाकणाऱ्या तरुणाच्या मोबाईलचे लोकेशन प्राप्त केले. यावेळी तो वडारवाडी शिवाजीनगर परिसरात असल्याचे समजले. त्यानुसार कर्मचारी व माहिती देणारे त्याचे मित्र यांच्यासह जाऊन त्याला ताब्यात घेतले.



त्यानंतर त्याला पोलिस ठाण्यात आणून तो करत असलेला विचार कसा चुकीचा आहे, अनेकांना संघर्ष करत असताना कसे अपयश आले तरी देखील त्यांनी हार न मानता प्रयत्न करून यश प्राप्त केले, असे समजावून सांगत त्याचे समुपदेशन केले. त्यानंतर तरुणाच्याही लक्षात आले की, तो करत असलेला विचार कसा चुकीचा आहे. यापुढे त्याने असा विचार कधी करणार नाही, असे आश्वासन पोलिसांना दिले. त्यानंतर पोलिसांनी तरुणाला त्याच्या मामाच्या ताब्यात दिले.